SAKAL - 22/11/22



अकोला : श्री राज राजेश्वर मंदिर परिसरात सायबर सुरक्षा जागरूकता अभियान राबविताना विद्यार्थी.

# श्रीराजराजेश्वर मंदिर परिसरात सायबर सुरक्षा जागरूकता अभियान

**अकोला, ता. २२ :** श्री राज राजेश्वर नगरीतील जागृत देवस्थान परिसरात शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयातर्फे सायबर सुरक्षा जागरूकता अभियान राबविण्यात आले.

महाविद्यालयातील 'सायबर सेक्युरीटी अवेअरनेस' उपक्रमाच्या विद्यार्थिनी साक्षी झोपे, ऋतुजा भोपुलकर, शीतल साखरे आणि नेहा टेरे यांनी दर्शनासाठी आलेल्या शिवभक्तांना सायबर गुन्हे कसे घडतात आणि हे घडू नये म्हणून नेमकी कोणती काळजी घ्यावी, व्हॉट्स ॲप, एटीएम च्या वापराविषयी सविस्तर माहिती सांगितली. इंटरनेट, मोबाईलच्या सुरक्षित वापर कसा करावा या विषयीची जागरूकता केली.

यावेळी सायबर सुरक्षा टिप्स लिहलेले पॉमप्लेटस शिवभक्तांना वाटप करण्यात आले. मंदिर विश्वस्त ॲड. रामेश्वर ठाकरे, ॲड. राम पाटील भौरदकर, गजानन घोंगे यांच्या परवानगीने हा उपक्रम राबविण्यात आला. हा उपक्रम 'क्विक हिल फाउंडेशन, पुणे' आणि 'महाराष्ट्र सायबर' यांच्या सहयोगाने आणि महाविद्यालयाचे माननीय प्राचार्य डॉ. जगदीश साबू, उपक्रमाचे समन्वयक डॉ.हरिदास खरात यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. या वेळी भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. संजय देवडे, व्यवस्थापक अशोकजी जोशी आणि गजानन खत्री यांनी उपस्थित राहून उपक्रमास सहकार्य केले.